Historicity Research Journal Impact Factor : 1.9152 (UIF)
ISSN : 2393-8900 Volume - 3 | Issue - 8 | April – 2017

# साठोत्तरी दलित कवितेतील सामाजिक जाणिवा

**प्रा. परमेश्वर हटकर**
**मराठी विभाग , माऊली महाविद्यालय, वडाळा, ता. उ. सोलापूर जि. सोलापूर.**




***प्रस्तावना :***

मराठी साहित्यात नव्या संवेदनशीलतेचे दर्शन घडते. प्रत्येक कालखंडाची एक विशिष्ट संवेदनशीलता असते. स्वातंत्र्य मिळूनही सामान्य माणूस आज असमाधानी आहे. स्वातंत्र्यापूर्वी जी स्वप्ने उराशी कवटाहलेली होती. त्या सर्व स्वप्नांचा फुलोरा पार गळून गेला आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ज्ञानाच्या कक्षा वाढल्या. समाजा समोरच्या समस्या वाढल्या. जीवन आता सरळ रेषेत नसून ते विलक्षण गुंतागुंतीचे बनले आहे. मानव समृध्दिच्या, परिवर्तनाच्या मागे धावत आहे. त्यामुळे समाज वेगळा पडत चालला आहे. याचाच परिणाम साहित्य विश्वात घडत आहे. त्यात ग्रामीण दलित, स्त्रीवादी, आदि चळवळीच्या माध्यमातून साहित्य समृध्द होत गेले. साहित्याला अधिक प्रगल्भता येत गेली. "साठोत्तरी दलित कवितेतील सामाजिक जाणिवा यांचा शोध प्रस्तूत निबंधात घेत आहे.

१९७६ रोजी नागपूर येथे दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना बाबूराव बागूलांनी म्हटले, "दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उध्वस्त करू बघणारा, जीवन नव्याने मांडू बघणारा होय. "

महाबळेश्वरच्या साहित्य संमेलनातील परिसंवादात प्रा.केशव मेश्राम म्हणाले होते, "की हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृशांना दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्य साहित्यास दलित व्याख्येत समाविष्ट होतात. "

दलित साहित्याची निर्मिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौतम बुध्द, म.फुले, मार्क्स, यांना प्रेरणास्थानी ठेवून झाली. दलित साहित्यात वेदना, विद्रोह, नकार यातून दलित साहित्याचे लेखन होऊ लागले.

दलित कवितेचा जन्म दलित- मुक्तीलढ्यातून झालेला आहे. व्यक्तीच्या दुःखापेक्षा समुहाच्या दुःखाल वाचा फोडण्याची रित संत चोखा मेळ्यापासून आली आहे. त्यांच्या अभंगातून कण्हणे ऐकू येते, चीड व्यक्त होते की ती उपेक्षित, दलित समुहाची. दलित कविता ही समुहाच्या वेदनेची कविता आहे. माणसाचे गाणे गाणा-या माणसाची कविता आहे.

दलित कविता विभूतिपूजक बनत नाही तर ती क्रांतीसन्मुख आहे. दलितांची कविता त्यांच्या वाट्याला आलेल्या जीवनाचे नुसते चित्रण करीत नाही तर ती जीवनभाष्यच असते. उदाहरणादाखल प्रमुख दलित कवींचा परामर्श देता येईल.

**१. नारायण सुर्वे -**

१९६० नंतरच्या कालखंडात एका उपेक्षित, दलित स्तरात जन्म घेऊनही सुर्वेची कविता प्रकृतीने आणि प्रवृत्तीने वेगळी आहे. त्यांच्या कवितेची अविष्कारशैली मर्ढेकरी कवितेची आहे.

नाराण्या सुर्वेनी आपली स्फूर्तिस्थाने शोधलेली नाहीत. सभोवतालच्या परिसरात ते काही श्रध्दा जागत्या ठेवून काव्याचा शोध घेतात. मला वाटते त्यांची कविता लढाऊ वृत्तीची, समाज क्रांतीची उपासना करणारी, नव्या आनंदभूवनाचे स्वप्न पाहणारी आहे.

'ऐसा गा मी ब्रम्ह' च्या प्रस्तावनेत ते म्हणतात की, जे जाणवले, काळजात सलले तेच शब्दरुप घेऊन बाहेर पडले ङ

**"थोडे सहिलेले, जोखिलेले आहे**
**माझ्या जगाची एक गंधवेणाही त्यात आहे.**
**केव्हा चुकली मुकलो नवे शिकलोही आहे.**
**जसा जगत आहे मी तसाच शब्दात आहे. "**

'माझी आई' या कवितेत एक थरथरता अनुभव व्यक्त करतात. आईच्या चिरविहरहाचा, आई गेली त्या रात्री काय झाले ते सांगताना म्हणतात-

**"त्याच रात्री आम्ही पाचांनी**
**एकमेकास बिलगूनी आईची मायाच समजून**
**घेतली चादर ओढून आधीचे नव्हतेच काही**
**आता आईदेखील नाही. "**

सुर्वे गतकाळातील दु:ख, अपमान, छळ, अन्याय इ. चे चित्रण करण्यापेक्षा भविष्यावर श्रध्दा ठेवून आहेत म्हणून त्यांची कविता सुर्यप्रकाशाला सामोरी जाणारी आहे. वास्तवतेचा शोध घेणारी स्वप्ने फुंकुन सत्य जाणावे असा त्यांच्या मनाचा धर्म आहे.

**''एका नव्या क्रांतीकडे, नव्या प्रकाशाकडे**
**आमचे घोडे उधळले, तर हे देशा**
**कृतघ्नतेचे आरोप आमच्यावर करुन नकोस**
**तुझ्या आकाशातील आम्हीही तारे आहोत**
**हे विसरू नकोस. ''**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही सामान्य माणूस सुखी नाही याचा त्यांना विषाद वाटतो. सर्वसामान्य जनतेच्या दुखांना मुख करणारी त्यांची कविता आहे.

'भविष्याचे पाखरू माझ्या खांद्यावर आहे. ' आणि श्रमणा-याचा सूर्य संगाती आहे. ' असे म्हणणा-या सुर्व्यांना माणूस महान वाटतो. सामाजिक जाणिव व्यक्त करणारी, वास्तवतेचा शोध घेणारी, नव्या समाजरचनेचे स्वप्न पाहणारी सूर्वे यांची कविता अधिक महत्त्वाची आहे.

**२. नामदेव ढसाळ -**

रसाळ नामदेवापासून ते ढसाळ नामदेवाची दुसरे पसायदान ठरणारी 'माणसाने' ही कविता अन्य दलितांच्या कवितेपेक्ष अंतर्बाह्य निराळी आहे. विशेषत: पांढरापेशा वाचकाला चक्रावून टाकणारी आहे. ढसाळ मुक्तिलढ्यात सामील झालेले कवी म्हणून त्यांची भाषा लढ्याची.

दलित कवींनी नकाराबरोबर माणसाचे गाणे स्वीकारले आहे. माणुसकीला महान मानणारे जग 'माणसाने' या कवितेत स्वप्न व्यक्त करताना म्हणतात-

**''नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लुटु नये,**
**आभाळाला आजोबा अन जमिनीला आजी मानून त्यांच्या कुशीत**
**गुण्यागोविंदाने आनंदान रहावे**
**चंद्रसुर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे**
**एक तीळ सर्वांनी करंडून खावा माणसावरच सूक्त रचावे**
**माणसाचे गाणे गावे माणसाने ''  ४**

या भाषेमागे एक तात्त्विक अधिष्ठान आहे. स्वातंत्र्य, समता बंधुत्त्व व सामाजिक न्याय ही चार तत्त्वे दलित कवींना श्रेष्ठ वाटतात. 'स्वातंत्र्यात माणूस निराश होतो. ' अशी ढसाळांची प्रतिक्रिया आहे. म्हणून ते कडवटपणे लिहितात-

**''  पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद**
**महाकाय  भोगष्ट**
**स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे.**
**रामराज्याच्या कितव्या घरात आपण -हातोत**
**उद्‌गम विकास, उंची संस्कार, संस्कृती**
**कंचा मुलभुत अर्थ स्वातंत्र्याचा. ''  ५**

ढसाळांच्या कवितेची भाषा अनुभव विश्वाशी संवादी आहे. ते पुर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम देत नाहीत. कारण त्यांच्या जीवनात 'विराम' नाही. आहेत फक्त प्रश्न आणि उद्‌गार ! ते भोवतीच्या वास्तवाची भयानकता व्यक्त करतात. त्यामुळेच दलित कवीमध्ये त्यांचे स्थान अधिक महत्त्वाचे आहे. हे नाकारता येत नाही.

**३. दया पवार -**

दया पवारांनी मुबलक कविता लेखन केले. त्यांचे जीवंत अनुभव विश्व 'कोंडवाडा' या कवतासंग्रहात प्रकट झाले आहे. दया पवारांचं भाग्य असं थोर की, त्यांना रोखठोक भाषेत अन्याय, दुख वेशीवर टांगणारे सुर्वे भेटले. प्रभोभ, विद्रोह व्यक्त करणारे बागुल मित्र म्हणून लाभले. सांस्कृतिक संघर्षाची जाणीव असलेले अभ्यासक डॉ. वानखेडे भेटले आणि पानतावणेंच्या 'अस्मितादर्श' मध्ये अनुभव मांडायला जागा मिळाली. पवारांची कविता आर्त, करुण स्वरात व्यथा गुंफिते तर आवेगाने कड्यावरुन कोसळत राहते.

दलित वर्गाला अजुनही पशुपातळीवरच जगावे लागते. - देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी तो बलिदान करतो. पण तरीही त्याच्या वाट्याला येते ती अस्पृश्यता आणि म्हणून छळ! जातिव्यवस्था आणि आर्थिकदरावस्था दलितंची कशी कोंडी करते याचे चित्र 'कोंडवाडा' मधून उमटले आहे. त्याला तोंड नाही कोंडवाड्यातील व्यथ रंगवता दया पवार  'कोंडवाडा' फोडून बाहेर येण्याची भाषा करू लागतात.

**''आता तुम्हीच प्रकाशचे पुंजके व्हा अन् क्रांतीचा जयजयकार करा''६**
**लढण्याचा निर्धार व्यक्त करताना म्हणतात-  ''इंगळ वेचणारा हा फिनिक्स पक्षी**
**बलिष्ठ आकाशाला भिडणारा आहे.  तुला मला जे सुख - वैभव देशाने**
**कधी वाट्यालाच येऊ दिले नाही.   ते सारं सारं पायी खेचून आणणार आहे. ''७**

दया पवार सांस्कृतिक द्वंद्व नाहीसे करण्यासाठी आपली कविता बळी पडली तरी चालेल असं 'मरण' कवितेत लिहितात. तेव्हा विलक्षण दुख होतं. त्यांच्या कवितेमागे आत्मार्पणाची भावना आहे.

**४. वामन निंबाळकर -**

वामन निंबाळकरांचे दुख ते ज्या वस्तीत वाढले त्या गावकुसाबाहेरच्या विदारक दुखाचे! वर्षानुवर्ष गावकुसाबाहेर जगत असलेल्या समाजाची कुणी दखल घेतली नाही की, कुणी त्यांच्या दुखावर उपाय योजला नाही. म्हणून निंबाळकर म्हणतात ः

**''ह्या गावकुसाबाहेरचे वाळलेले चिरडलेले जीवन**
**विषय झालाच नाही तुमच्या कवितेचा त्यांच्या रक्ताळलेल्या पावलांना, जळणा-या अन्नुला**
**स्पर्शला नाही तुमचा कविता कविता शब्द शब्द पेरलेच नाहीत तुम्ही**
**या माणसांच्या माणुसकीसाठी त्यांच्या रिकाम्या पोटासाठी बळ उठलेल्या पाठीसाठी'' ८**

ही तक्रार खरी आहे. पांढरपेशा लेखकांनी गावकुसाबाहेरच्या जीवनाचे चित्रण फिकट केले आहे.

**त्यांच्या जीवनाच्या लक्ष्मण रेषा कधीच ओलांडल्या नाही.**
**''शब्दांनीच पेटतात घरे, दारे, देश आणि माणसे सुध्दा**
**शब्द विझवतात आगही शब्दांनी पेटलेल्या माणसांची'' ९**

अशी शब्दशक्ती असणा-यांनी महाकव्ये रचली ती सोन्याचा घास खाणारांची. पण त्यांना दलितांच्या आसवांची गाणी लिहिता आली नाहीत.
जो अपमान, छळ, अन्याय सोसला तो मनात जपला आहे. पण आता हे सहन करणार नाही अशी त्यांची प्रतिज्ञा आहे म्हणून ते म्हणतात -

**''जे बोलताहेत आमच्यातील स्वत्त्वाची भाषा ते सारे एकत्र येणार आहेत**
**आणि गर्जना करणार आहेत जयजयकार क्रांतीचा, माणुसकीचा**
**उदयाचा इतिहास आमचा आहे आणि इतिहास लिहिणाराही'' १०**

माणूस म्हणून उभे राहण्यासाठी निंबाळकरांची गावकुसाबाहेरची कविता जन्मली आहे. किंव्हा - मुंग्यांना साखर घालणारा हिंदू धर्म अस्पृश्यांना उपाशी ठेवतो शिळ्या - पाक्या, उष्ट्या फेकलेल्या तुकड्यांवर गुजराण करायला सांगतो हा अन्याय नव्हे काय? म्हणून किसन फागू देवाला आळवितात ः

**''हरी मज पशू कर वा पक्षी कर परि करु नको महार**
**पक्षीयोनी मज राघू केले तरी हिंदू शिकविती**
**महार केलिया विटाळ मानूनी शिक्षण - बंदी करिती**
**यास्तव पशू कर वा पक्षी कर'' ११**

'ए फॉर आंबेडकर 'बी' फॉर बुध्दिझम ही राजकरणाची एबीसीडी शिकलो आहोत असं म्हणणारे दादाभाऊ साळवे म्हणतात

**''पचवीस करोड दलितांनो ! काळजात सुई घेऊन दुख काढणा-या माणसांनो**
**ओळखा आपण आपणाला कुठपर्यंत मरायचं आम्हीच असं**
**देशाच्या कानाकोप-यात'' १२ तर अर्जुन डांगळे म्हणतात -**
**''ह्या गर्दीत कोण कुणाच्या व्यथा ऐकणार मला हवेय जगणे**
**ज्यात स्वत्व असेल''१३**

यामध्ये दलितांची कोंडी करणारी समाजव्यवस्था बदलली पाहिजे असे व्यक्त करतात. केशव मेश्राम उपहासाच्या स्वरात म्हणतात-

**''आमच्या वस्तीत भांबावतो पोस्टमन गोंधळतात संस्कार, अडखळते सभ्यता**
**अंधारतो सुर्यही चिखलात उठावेत गुरांच्या खुरांचे ठसे, तशी ठसठसती**
**आमची घरे, त्यातच असते प्रवाहोत्सूक मन'' १४**

**निष्कर्ष -**

दलित कवींच्या कविता वाचताना त्यांच्या प्रेरणा, जग वेगळे आहे हे जाणवते. दलित कविता आपल्या भोवतालच्या पारंपारिक साखळया तोडून मराठी कवितेच्या क्षेत्रात प्रतिष्ठा पावली आहे.

नामदेव ढसाळ, केशव सुर्वे, दया पवार, निंबाळकर, माधव कोंडविलकर, यशवंत मनोहर, अर्जुन डांगळे यांचे कवितासंग्रहच साक्ष देतात. ह्या कवींनी दलित कवितेला समृध्द केले आहे.

दलित कविता बौध्दिक व भावनिक घणाघात घालीत आहे. लेखनातील एक सूर वैफल्याचा आणि जाणीव निरर्थकतेची, विद्रोहाची आग फुलवणारी, चीड, संताप, व्यक्त करणारी कविता छंदबध्द, नादमधूर, अलंकारप्रिय असणारच नाही. कवितेच्या व्याकरणाची मोडतोड करून टाकली आहे. केशवसूतांप्रमाणे दलित कवींना वाटते की, जिकडे-तिकडे माझी भावंडे दिसताहेत म्हणूनच दलित कवितेने तुच्छता, अलंकार, वैरभाव, अविश्वास इ. राक्षसांच्या मगरमिठीतून मुक्त झाले पाहिजे.

'जागृत होऊ लागलेल्या दलित जीवनाचा तेजस्वी हुंकार होय. '

तिने पिडितांचे दुख सांगायलाच हवे पण तिने आत्मपीडक व परपिडक होऊ नये. " अस्पृश्यतेचा अंत आणि नव्या माणसांचा जन्म हेच तिचे स्वप्न आहे. "

**संदर्भ ग्रंथ -**


**१. दलित साहित्य वेदना व विद्रोह - भालचंद्र फडके**
**२. दलित साहित्य एक अभ्यास - अर्जुन डांगळे**
**३. दलित साहित्य प्रवाह व प्रतिक्रिया - गो.म. कुलकर्णी**
**४. विद्रोही कविता - केशव मेश्राम**